5783

जा.क्र./ लाशमनपाला/कोवि/ /2023-24
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
कोंडवाडा विभाग,
दिनांक 12 / 9 / 2023

## ई-कोटेशन

प्रति,

-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

**विषय :- 1) लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर आजारी, अपघाती, जखमी, मोकाट/बेवारस फिरणारे गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे.**

**2) मोकाट आजारी जनावरास तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी कडून औषध उपचार करणे, a) किरकोळ आजार b) गंभीर आजार**

**3) दुरूस्त होईपर्यंत आजारी जनावरांचे संगोपन करणे.**

***4) आजरी जनावर उपचार करून दुरूस्त झाल्यास कोडवाडयात दाखल करणे***

**5) आजारी जनावर मृत झाल्यास नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे.**

**संदर्भ :- मा. आयुक्त यांचे कार्यालयीन टिपणी मान्यता दि.17/08/2023**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाचे कोंडवाडा विभागाकरिता खालील नमुद केलेला तपशिल **1) लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर आजारी, अपघाती, जखमी, मोकाट/बेवारस फिरणारे जनावरे पकडणे. 2) मोकाट आजारी जनावरास तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी कडून औषध उपचार करणे, a) किरकोळ आजार b) गंभीर आजार 3) दुरूस्त होईपर्यंत आजारी** ***जनावरांचे संगोयन करणे. 4) आजरी जनावर उपचार करून दुरूस्त झाल्यास कोडवाडयात दाखल*** **करणे 5) आजारी जनावर मृत झाल्यास नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे.**

त्याकरिता आपणाकडून बंद लिफाफ्यातून दि 21 / 9 / 2023 रोजी दुपारी 5.00 वाजता मा. आयुक्त, मनपा, लातूर यांच्याकडे पोहचतील असे दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

कोटेशन दि 23 / 9 /2023 रोजी दुपारी 5.00 वाजता फोडण्यात येवून मान्य असलेल्या सदरील ई निविदा नोंदणीकृत स्वंयसेवी सेवाभावी संस्था/(NGO)/महिला बचतगट,मजूर सहकारी संस्था ,बेरोजगार संस्था यांना या निविदा फक्त महानगरपालिकेच्या ई कोटेशन भरणा-या ठेकेदारांना संबंधित दुरुस्ती / काम करण्याची ऑर्डर देण्यात येईल. ऑर्डर दिल्यानंतर 7 दिवसात काम करावे लागेल.

**नियम व अटी-**

1) प्रथम कामाची मुदत निविदा मान्य झाल्यापासून 1 वर्ष कालावधीसाठी राहील. कामाचे स्वरुप व काम समाधानकारक असल्यास मुदत वाढवून देण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांना राहिल.
2) कामे निविदा रक्कमेच्या 1% (अनामत रक्कम रू. 7000/-) रोखीने मनपा फंडात जमा करून पावती कोटेशन सोबत सादर करावी.

Scanned with CamScanner

3) कामासाठी आवश्यक असलेले यंत्र सामुग्रीची यादी स्वत:चे असल्याचे अथवा भाडे तत्वावर घेणार असल्याची कंत्राटदाराने प्रतिज्ञापत्र (कामाच्या स्वरूपानुसार) यंत्रसामुग्री निश्चित करावी. (वाहन व जनावराच्या वाहतुकीसाठी इतर साहित्य)

4) उपलब्ध तांत्रीक मनुष्यबळाची यादी पदनाम व शैक्षणिक पात्रतेसह

5) लिफाफा क्र. 01 मध्ये सादर केलेले सर्व दस्ताऐवज खरे असल्याचे प्रतिज्ञापत्र

6) जनावरे पकडण्याची शास्त्रीय पध्दत असावी .कोणत्याही प्रकारच्या रसायनाचा वापर करता येणार नाही . पकडण्यात आलेल्या जनावरांची नोंद योग्य रितीने घ्यावी .यासाठी टॅग पध्दत अथवा मनपा निर्देशीत करील ती पध्दत अवलंबवावी लागेल .

7) *मा.मंत्री/अती महत्वाचे व्यक्ती यांचे दौरे व धार्मिक सण, महोत्सव व मिरवनुका या प्रसंगी कार्यालयीन* आदेशा प्रमाणे काम करावे लागेल.

8) कामाचा व्याप पाहता कामगार कमी किंवा जास्त करणे बंधनकारक राहील.

9) लातूर शहरातील नागरीकांनी मनपा हद्दीत 24 तासात केंव्हाही आजारी मोकाट जनावारांची किंवा पिसाळलेल्या जनावारांची तक्रारी केल्यास ,तक्रार प्राप्त होताच त्वरीत त्याचा निपाटारा करणे कंत्राटदार चालकास बंधनकारक राहील .

10) सह कर्मचारी/कॅचर्स हे योग्य शिक्षीत व प्रशिक्षित असावेत .

11) प्रती महिन्याच्या कामाचे देयक स्वतःह सादर करावे लागेल .आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कांही कारणास्तव देयकाची रक्कम देण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचा अधिकार निविदा धारकास राहणार नाही . निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देयक अदा केले जातील. या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत काम बंद ठेवता येणार नाही.

12) सदरील कामी कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम दिली जाणार नाही .

13) निविदा धारकास बालकामगार प्रतिवंधक कायदा अंतर्गत बालकामगार लावता येणार नाही .

14) *निविदा धारकांकडे काम करणा-या कामगारांना महानगरपालिका प्रशासन सेवेत कोणत्याही पदावर* नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही व महापालिका सेवेत समावून घेतले जाणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही .

15) आजारी मोकाट जनावरे पकडताना कर्मचाऱ्यास किंवा नागरीकास कोणताही अपघात, धार्मिक भावना दुखावणे इ.घटना घडल्यास निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहिल.

16) गरजे प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाचे कर्मचारी/अधिकारी योग्य मदत सहकार्य करतील.

17) कार्यारंभ आदेशानंतर तात्काळ कामास सुरुवात करावी लागेल .

18) निविदा दाखल केल्यानंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा कंत्राटाचे काम मुदतीपूर्व सोडण्यात आल्यास अनामत रक्कम जप्त करुन निविदा प्रक्रीयेसाठी झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करण्यात येईल .

19) दैनिक कामाचा अहवाल कोंडवाडा प्रमुख, लातूर शहर महानगरपालिक, लातूर यांच्याकडे सादर करावा लागेल .

20) पाळीव प्राणी जनावरा संबंधी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा 1976 महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा 1995 प्रमाणे व इतर लागू असलेले सर्व संबंधीत नियम व अधिनियमातील अटींचे पालन करणे निविदा धारकास बंधनकारक राहील .

21) निविदा धारकाने सदर कामासाठी शारिरीक दृष्ट्या सुदृढ व सक्षम कामगार नेमावे.

22) लेबर ॲक्टचे पालन करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

23) *सदर कार्य हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे व सार्वजनिक हिताचे असल्यामुळे कंत्राटदाराला* कोणत्याही परिस्थितीत महानगरपालिका, लातूरला सबळ कारणासह पुर्व सुचना न देता काम बंद करता

Scanned with CamScanner

येणार नाही अथवा एकतर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही .तसे केल्यास कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्कम व देय असलेली सर्व देयके जप्त करण्यात येतील व त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल व प्रसंगी कंत्राटदाराविरुध्द महापालिकेची फसवणूक केली म्हणून कायदयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

24) कंत्राटदाराच्या कामाबाबत तक्रार असल्यास व काम समाधानकारक न आढळल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा किंवा कंत्राट रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका , लातूर यांचेकडे सुरक्षित आहे .

25) आजारी मोकाट जनावरे पकडणा-या कामगारांना युनीफॉर्म असावा व आपल्या नियुक्त केलेल्या सर्व कर्मचा-यांची नावाची यादी संपूर्ण पत्यासहीत कार्यालयात सादर करावी लागेल तसेच वेळोवेळी कामगार बदलले असतील तर सुची कार्यालयात सादर करावी लागेल व त्यांचे ओळखपत्र सादर करावे जसे मतदान ओळखपत्र , आधार कार्ड , ड्रॉव्हींग लायसन्स इ .जनावरे पकडताना सर्व कर्मचा-यांचे ओळखपत्र सोबत असावे .

26) याबाबत केलेल्या कामाचे अद्यावत रेकॉर्ड ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व वेळोवेळी रेकॉर्डची मागणी केल्यास देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

27) अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र

28) उपरोक्त सर्व अटी व वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेश/निर्देश/सुचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील .

29) **कोटेशन सादर करावयाची पध्दत खालील प्रमाणे-**

**अ) लिफाफा क्र. 01 (तांत्रीक)**

Technical व Technical Documents बंद लिफाफ्यात सादर करावे.

1) कामाची 1% अनामत रक्कम नगदी ने या कार्यालयात जमा केलेली पावती किंवा राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल डिपॉझीट जमा करणे.
2) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
3) संस्थेचे पॅन कार्ड
4) जी.एस.टी. प्रमाणपत्र
5) आयकर प्रमाणपत्र

**ब) लिफाफा क्र. 02 (आर्थिक)**

1) लिफाफा क्र. 02 मध्ये कामाचे दर भरून सादर करावे.

**उपायुक्त**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

Scanned with CamScanner

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

## (कोंडवाडा विभाग)

## ई-कोटेशन

**लिफाफा क्र.**

| अ.क्र | कामाचा तपशील | नग/संख्या/ प्रति/ जनावर | किंमत |
|---|---|---|---|
| 1 | लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर आजारी, अपघाती, जखमी, मोकाट/बेवारस फिरणारे गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे. | ------ | --------------/- |
| 2 | मोकाट आजारी जनावरास तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी कडून औषध उपचार करणे,<br>a) किरकोळ आजार<br>b) गंभीर आजार | ------ | --------------/- |
| 3 | दुरूस्त होईपर्यंत आजारी जनावरांचे संगोपन करणे. | ------ | --------------/- |
| 4 | आजरी जनावर उपचार करून दुरूस्त झाल्यास कोंडवाडयात दाखल करणे | ------ | --------------/- |
| 5 | आजारी जनावर मृत झाल्यास नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे. | ------ | --------------/- |

उपायुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with CamScanner